म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १६६०

# ...य संग्रह

...ताभ्यो नमः ।

...ताभ्यो नमः ।

...देवताभ्यो नमः ।

REFBK-0013507
REFBK-0013507

मुंबई स्वाध्याय मंडळ

३८९९९
काव्य
धा७४५
सं.शा.
१९९०

REFBK-0013507

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ७३५०५

# स्वाध्यायसंग्रह

## नमनाचे अभंग

(१)

सुंदर तें ध्यान उभें विटेवरी । कर कटावरी ठेवूनीया १
तुळसी गळां हार कासे पितांबर । आवडे निरंतर हेंचि ध्यान २
मकर कुंडलें तळपती श्रवणीं । कंठीं कौस्तुभमणी विराजीत ३
तुका म्हणे माझें हेंचि सर्व सुख । पाहीन श्रीमुख आवडीनें ४

(२)

रूप पहातां लोचनीं । सुख झालें हो साजणी १
तो हा विठ्ठल बरवा । तो हा माधव बरवा २
बहुत सुकृताची जोडी । म्हणुनी विठ्ठलीं आवडी ३
सर्व सुखाचें आगर । बाप रखुमादेवीवर ४

(३)

अवघाचि संसार सुखाचा करीन । आनंदें भरीन तीन्ही लोक १
जाईन गे माये तया पंढरपूरा । भेटेन माहेरा जीवींचिया २
सर्व सुकृताचें फळ मी लाहीन । क्षेम मी देईन पांडुरंगीं ३
बाप रखुमादेवीवरु विठ्ठलेंसी भेटी । आपुलें संवसाटी करुनी ठेला ४

(४)

बोलूं ऐसे बोल । जेणें बोलें विठ्ठल डोले १
प्रेम सर्वांगाचें ठायीं । वाचे विठ्ठल रखुमाई २
नाचूं कीर्तनाचें रंगीं । ज्ञानदीप लावूं जगीं ३
परेहून पर तें घर । तेथें राहूं निरंतर ४
सर्व सत्ता आली हाता । नामयाचा खेचर दाता ५

## अनुक्रमणिका


| | | पान |
|---|---|---|
| १. | नमनाचे अभंग | १ |
| २. | भूपाळ्या | ३ |
| ३. | आरत्या | ६ |
| ४. | मनाचे श्लोक | ९ |
| ५. | स्थितप्रज्ञलक्षणें | ११ |
| ६. | दैवी व आसुरी संपत्ति | १३ |
| ७. | सदाचार | १६ |
| ८. | गीतासार | १८ |
| ९. | प्रेमळ पदें | २० |
| १०. | करुणाष्टकें | २३ |
| ११. | पसायदान-केकावली | २७ |
| १२. | उपदेशपर फटका | २९ |
| १३. | उत्तमलक्षण | ३० |
| १४. | उपदेशपर अभंग | ३२ |
| १५. | हिंदी पदें | ३६ |
| १६. | इंग्रजी पदें | ३८ |



आवृत्ति पहिली : गीताजयंती, शके १८८६; पृष्ठसंख्या ४०; मूल्य ६० पैसे

प्रकाशक : प्रा.मा.गं. महाजन, मुंबई स्वाध्याय मंडळ, रुपारेल कॉलेज, मुंबई १६.

मुद्रक : वि. ग. माटे, विश्वकर्मा मुद्रणालय प्रा. लि., ४०५ नारायण पेठ, पुणे २.



१९६४

3८२८८
काव्य
धार्मिक
सं.शा.
१६६०

REFBK-0013507
REFBK-0013507

# स्वाध्यायसंग्रह

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
प्र. क्र. ७३५०५

## नमनाचे अभंग

(१)

सुंदर तें ध्यान उभें विटेवरी । कर कटावरी ठेवूनीया १
तुळसी गळां हार कासे पितांबर । आवडे निरंतर हेंचि ध्यान २
मकर कुंडलें तळपती श्रवणीं । कंठीं कौस्तुभमणी विराजीत ३
तुका म्हणे माझें हेंचि सर्व सुख । पाहीन श्रीमुख आवडीनें ४

(२)

रूप पहातां लोचनीं । सुख झालें हो साजणी १
तो हा विठ्ठल बरवा । तो हा माधव बरवा २
बहुत सुकृताची जोडी । म्हणुनी विठ्ठलीं आवडी ३
सर्व सुखाचें आगर । बाप रखुमादेवीवर ४

(३)

अवघाचि संसार सुखाचा करीन । आनंदें भरीन तीन्ही लोक १
जाईन गे माये तया पंढरपूरा । भेटेन माहेरा जीवींचिया २
सर्व सुकृताचें फळ मी लाहीन । क्षेम मी देईन पांडुरंगीं ३
बाप रखुमादेवीवरु विठ्ठलेंसी भेटी । आपुलें संवसाटी करुनी ठेला ४

(४)

बोलू ऐसे बोल । जेणें बोलें विठ्ठल डोले १
प्रेम सर्वांगाचें ठायीं । वाचे विठ्ठल रखुमाई २
नाचूं कीर्तनाचें रंगीं । ज्ञानदीप लावूं जगीं ३
परेहून पर तें घर । तेथें राहूं निरंतर ४
सर्व सत्ता आली हाता । नामयाचा खेचर दाता ५

(५)

देह जावो अथवा राहो । पांडुरंगीं दृढ भावो १
चरण न सोडी सर्वथा । आण तुझी पंढरीनाथा २
वदनीं तुझें मंगल नाम । हृदयीं अखंडीत प्रेम ३
नामा म्हणे केशवराजा । केला पण चालवी माझा ४

(६)

घेई घेई माझें वाचे । गोड नाम विठोबाचें १
डोळे तुम्ही घ्यारे सुख । पहा विठोबाचें मुख २
तुम्ही आइकारे कान । माझ्या विठोबाचे गुण ३
मना तेथें धाव घेई । राही विठोबाचें पायीं ४
तुका म्हणे जीवा । नको सोडूं या केशवा ५

(७)

धाव घाली आई । आतां पाहतेसी काई १
धीर नाहीं माझे पोटीं । झालों वियोगें हिंपुटी २
करावें शीतळ । बहु झाली हळहळ ३
तुका म्हणे डोई । कधीं ठेवीन हे पायीं ४

(८)

जेथें जातों तेथें तूं माझा सांगाती । चालवीसी हातीं धरूनीया १
चालों वाटे आम्हीं तुझाची आधार । चालविसी भार सर्व माझा २
बोलों जातां बरळ करिसी ते नीट । गेली लाज धीट केलें देवा ३
आवघे जन मज झाले लोकपाळ । सोईरे सकळ प्राणसखे ४
तुका म्हणे आतां खेळतों कौतुकें । झालें तुझें सुख अंतर्बाह्य ५

# भूपाळ्या

(१)

उठा पांडुरंगा आतां दर्शन द्या सकळां
झाला अरुणोदय सरली निद्रेची वेळा । धृ० ।
संत साधु मुनी अवघे झालेती गोळा
सोडा सेजेसुख आतां पाहुं द्या मुखकमळा १
रंगमंडपीं महाद्वारीं झालीसे दाटी
मन उतावीळ रूप पहावया दृष्टीं २
राई रखुमाबाई तुम्हां येऊं द्या दया
सेजें हालवुनी जागे करा देवराया ३
गरुड हनुमंत पुढें पाहती वाट
स्वर्गींचे सुरवर घेऊनि आले बोभाट ४
झालें मुक्तद्वार लाभ झाला रोकडा
विष्णुदास नामा उभा घेऊनी काकडा ५

(२)

उठा सकळ जन उठले नारायण
आनंदले मुनिजन तीन्ही लोक १
करा जयजयकार वाद्यांचा गजर
मृदंग विणे अपार टाळ घोळ २
जोडोनियां कर मुख पहा साजिरें
पायावरी शीर ठेवोनियां ३
तुका म्हणे काय पढीयंते मागा
आपुलालें सांगा दुःख सकळ ४

( ३ )

उठा उठा हो सकळिक । वाचे स्मरावा गजमुख
ऋद्धिसिद्धींचा नायक। सुखदायक भक्तांसी। सुखदायक दासांसी।धृ०।
अंगीं शेंदुराची उटी। माथां शोभतसे कीरिटी
केशरकस्तुरी ल्लाटीं। हार कंठीं साजिरा १
कानीं कुंडलांची प्रभा। चंद्र सूर्य जैसे नभा
माजीं नागबंदी शोभा। स्मरतां उभा जवळी तो २
कांसे पितांबराची घटी। हातीं मोदकांची वाटी
रामानंद स्मरतां कंठीं। तो संकटीं पावतो ३

( माजीं = कंबरेभोंवतीं. नागबंदी = नागाच्या आकाराचा कंबरपट्टा )

( ४ )

उठोनियां प्रातःकाळीं । जपा रामनामावळी
स्वयें ध्यातो चंद्रमौळी। शैलबाळीसमवेत । धृ० ।
राम योग्यांचें मंडण । राम भक्तांचें भूषण
राम धर्माचें रक्षण । संरक्षण दासांचें १
रामें ताटका मारिली । रामें शिळा उद्धरिली
रामें जानकी पर्णिली। गणिका केली ते मुक्त २
रामें पाषाण तारिले। रामें दैत्य संहारिले
रामें बंदी सोडविले। मुक्त केले सुरवर ३
रामें रक्षिलें भक्तांसी । रामें सोडविलें देवांसी
राम दासाचे मानसीं । रामदासीं आनंद ४

(५)

उठा उठा हो वेगेंसीं । चला जाऊं पंढरिसी
भेटों विठ्ठलरखुमाईसी । त्रिविध ताप हरतील । धृ० ।
चंद्रभागे करूं स्नान । घेऊं पुंडलिकाचें दर्शन
तेथें भेटति संतजन । तेणें मन निवेल १
गंगा यमुना सरस्वती । कृष्णा वेण्या भागीरथी
तुंगभद्रा भोगावती । येती श्रीपतिदर्शना २
तापी नर्मदा कावेरी । पंचगंगा गोदावरी
स्नानें केलिया बोहरी । महादोष हरतील ३
रामानंदाचें माहेर । क्षेत्र नाम पंढरपूर
माता पिता विश्वंभर । पैलपार तरतील ४

(६)

उठा प्रातःकाळ झाला । आत्माराम पाहूं चला
हा समयो जरि टळला । तरि अंतरला श्रीराम । धृ० ।
जीवशिव दोघेजण । भरत आणि शत्रुघन
आला बंधु लक्ष्मण । मन उन्मन होऊनी १
विवेक वसिष्ठ सद्गुरु । संतसज्जन मुनीश्वरू
करिती नामाचा गजरू । हर्षनिर्भर होउनियां २
सात्त्विक सुमंत प्रधान । नगरवासी अवघे जन
आला वायुचा नंदन । श्रीचरण पहात्रया ३
माता जानकी हरवली । होती प्रारब्धें लिहिली
तिची देहबुद्धी जाळिली । स्वीकारिली श्रीरामें ४
आजचि दिवाळी दसरा । पर्वकाळ आला घरा
रामानंदाच्या दातारा । भेटी माहेरा मज द्यावी ५

# आरत्या

## काकड आरत्या : श्री विठ्ठलाच्या

(१)

सहस्रदीपें दीप कैसी पाजळली प्रभा
उजळल्या दशदिशा गगना आलीसे शोभा १
काकड आरती माझ्या कृष्ण सभागिया
चराचर मोहरलें तुझी मूर्ति पहाया २
कोंदलेंसे तेज प्रभा झालीसे एक
नित्य नवा आनंद ओवाळितां श्रीमुख ३
आरती करितां तेज प्रकाशलें नयनीं
तेणें तेजें मिनला एकाएकी जनार्दनी ४

(२)

भक्तीचिया पोटीं बोध काकडज्योती
पंचप्राण जीवेंभावें ओवाळूं आरती १
ओवाळूं आरती माझ्या पंढरीनाथा
दोन्ही कर जोडोनी चरणीं ठेविला माथा २
काय महिमा वर्णुं आतां सांगणें तें किती
कोटी ब्रह्महत्या मुख पाहतां जाती ३
राही रखुमाबाई उभ्या दोही दों बाहीं
मयुरपिच्छ चामरें ढाळिती ठाईंच्या ठाईं ४
विटेसहित पाय मनोभावें ओवाळूं
कोटी रवि शशी दिव्य उगवलें हेळूं ५
तुका म्हणे दीप घेऊनी उन्मनीत शोभा
विटेवरी उभा दिसे लावण्यगाभा ६

(३)

निरंजनीं काकडज्योति उजळली वेळीं
ज्योतिं ज्योत प्रकाशे प्रकटे तैं सांवळी । धृ० ।
चला चला वेग आतां उदयास्त झांकले
स्वात्मारंगें क्रीडत हरी हे पहा विटे ठेले १
दाही दिशा दशा टाकुनि धावे सामोरी
पहावयास सुंदरा मनमोहन मदनारी २
अनंतकोटी ब्रह्मांडाचें उजाळलें गगन
प्रकाशलें तेथें होतो काकडा उन्मन ३
दीप्ति दीपावली आणि साउलिसि वागे
सांवलिया श्रीविठ्ठला ओवाळी अनुरागें ४
साधू सज्जनसंगें तल्लीन होउनीया काकडा
वेणूसुत हा करी तेथें वाजतसे चौघडा ५

(४)

**आरती गणपतीची**

सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची। नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची
सर्वांगीं सुंदर उटि शेंदूराची । कंठीं झलके माळ मुक्ताफळांची १
जयदेव जयदेव जय मंगलमूर्ति । दर्शनमात्रें मनःकामना पुरती । धृ० ।
रत्नखचित फरां तुज गौरीकुमरा । चंदनाची उटी कुंकुमकेशरा
हिरेजडित मुगुट शोभतो बरा। रुणझुणती नूपुरें चरणीं घागरिया २
लंबोदर पीतांबर फणिवरबंधना । सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना
दास रामाचा वाट पाहे सदना। संकटीं पावावें निर्वाणीं रक्षावें सुरवरवंदना ३

(५)

## आरती शंकराची

लवथवती विक्राळा ब्रह्मांडीं माळा । वीषें कंठ काळा त्रिनेत्रीं ज्वाळा
लावण्यसुंदर मस्तकीं बाळा । तेथुनिया जळ निर्मळ वाहे झुळझुळा १
जयदेव जयदेव जय श्रीशंकरा । आरती ओवाळूं तुज कर्पुरगौरा । धृ० ।
कर्पुरगौरा भोळा नयनीं विशाळा । अर्धांगी पार्वती सुमनांच्या माळा
विभुतीचें उधळण शितिकंठ नीळा । ऐसा शंकर शोभे उमावेल्हाळा २
देवीं दैत्यीं सागरमंथन पैं केलें । त्यामाजीं अवचित हाळाहळ जें उठलें
तें त्वां असुरपणें प्राशन केलें । नीळकंठ नाम प्रसिद्ध झालें ३
व्याघ्रांबर फणिवरधर सुंदर मदनारी । पंचानन मनमोहन मुनिजन सुखकारी
शतकोटीचें बीज वाचे उच्चारी । रघुकुलटिळक रामदासा अंतरीं ४

(६)

## आरती देवीची

दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारीं । अनाथनाथे अंबे करुणा विस्तारीं
वारी वारी जन्ममरणातें वारी । हारीं पडलों आतां संकट नीवारी १
जयदेवी जयदेवी महिषासुरमथनी । सुरवर ईश्वरवरदे तारक संजीवनी । धृ० ।
त्रिभुवनभुवनीं पाहतां तुजऐशी नाहीं । चारी श्रमले परंतु न बोलवे कांहीं
साही विवाद करितां पडले प्रवाहीं । ते तूं भक्तांलागीं पावसि लवलाही २
प्रसन्नवदने प्रसन्न होसी निजदासा । क्लेशापासुनी सोडविं तोडीं भवपाशा
अंबे तुजवांचून कोण पुरविल आशा । नरहरि तल्लिन झाला पदपंकज लेशा ३

# मनाचे श्लोक

मना सज्जना भक्तिपंथेंचि जावें । तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावें
जनीं निंद्य तें सर्व सोडूनि द्यावें । जनीं वंद्य तें सर्व भावें करावें १

मना वासना दुष्ट कामा न ये रे । मना सर्वथा पापबुद्धि नको रे
मना धर्मता नीति सोडूं नको हो । मना अंतरीं सार विचार राहो २

नको रे मना क्रोध हा खेदकारी । नको रे मना काम नाना विकारी
नको रे मना सर्वथा अंगीकारूं । नको रे मना मत्सरू दंभभारू ३

मना श्रेष्ठ धारिष्ट जीवीं धरावें । मना बोलणें नीच सोशीत जावें
स्वयें सर्वदा नम्र वाचें वदावें । मना सर्व लोकांसि रे नीववावें ४

सदा सर्वदा प्रीति रामीं धरावी । दुःखाची स्वयें सांडी जीवीं करावी
देहेदुःख तें सूख मानीत जावें । विवेकें सदा स्वस्वरूपीं भरावें ५

मना मानसीं दुःख आणूं नको रे । मना सर्वथा शोक चिंता नको रे
विवेकें देहबुद्धी सोडूनि द्यावी । विदेहीपणें मुक्ति भोगीत जावी ६

समर्थाचिया सेवका वक्र पाहे । असा सर्व भूमंडळीं कोण आहे ?
जयाची लिला वर्णिती लोक तीन्ही । नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ७

सदा सर्वदा देव सन्नीध आहे । कृपाळूपणें अल्प धारिष्ट पाहे
सुखानंद आनंद कैवल्यदानी । नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ८

सदा देवकाजीं झिजे देह ज्याचा । सदा रामनामें वदे नित्य वाचा
स्वधर्मेंचि चाले सदा उत्तमाचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ९

सदा बोलण्यासारिखें चालताहे। अनेकीं सदा एक देवासी पाहे
सगूणीं भजे लेश नाहीं भ्रमाचा। जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा १०

क्रमी वेळ जो तत्वचिंतानुवादें । न लिंपे कदा दंभवादें विवादें
करी सूखसंवाद जो ऊगमाचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ११

दिनाचा दयाळू मनाचा मवाळू । स्नेहाळू कृपाळू जगीं दासपाळू
तया अंतरीं क्रोध संताप कैंचा। जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा १२

न वेंचे कदा ग्रंथिंचा अर्थ कांहीं। मुखें नाम उच्चारितां कष्ट नाहीं
महाघोर संसार शत्रू जिणावा। प्रभाते मनीं राम चिंतीत जावा १३

बहू चांगलें नाम या राघवाचें । अति साजिरें स्वल्प सोपें फुकाचें
करी मूळ निर्मूळ घेतां भवाचें । जिवा मानवा हेंचि कैवल्य साचें १४

विवेकें क्रिया आपुली पालटावी । अती आदरें शुद्ध क्रीया धरावी
जगीं बोलण्यासारिखें चाल बापा। मना कल्पना सोडी संसारतापा १५

तुटे वाद संवाद तेथें करावा । विवेकें अहंभाव हा पालटावा
जनीं बोलण्यासारिखें आचरावें। क्रियापालटें भक्तिपंथेंचि जावें १६

फुकाचें मुखीं बोलतां काय वेंचे । दिसंदीस अभ्यांतरीं गर्व सांचे
क्रियेवीण वाचाळतां व्यर्थ आहे । विचारें मना तूंचि शोधूनि पाहें १७

जगीं धन्य तो रामसूखें निवाला । कथा ऐकतां सर्व तल्लीन झाला
देहभावना रामबोधें उडाली । मनोवासना रामरूपीं बुडाली १८

नसे गर्व आंगीं सदा वीतरागी। क्षमा शांति भोगी दयादक्ष योगी
नसे लोभ ना क्षोभ ना दैन्यवाणा। इहीं लक्षणीं जाणिजे योगिराणा १९

दिसे लोचनीं तें नसे कल्पकोडी। अकस्मात आकारलें काळ मोडी
पुढें सर्व जाईल कांहीं न राहे। मना संत आनंत शोधोनि पाहें २०

सदा विषयो चिंतितां जीव जाला। अहंभाव अज्ञान जन्मासि आला
विवेकें सदा स्वस्वरूपीं भरावें। जिवा ऊगमीं जन्म नाहीं स्वभावें २१

बरा निश्चयो शाश्वताचा करावा। म्हणे दास संदेह तो नीरसावा
घडीनें घडी सार्थकाची करावी। सदा संगती सज्जनाची धरावी २२

देहबुद्धि ते ज्ञानबोधें त्यजावी। विवेकें तया वस्तुची भेटी घ्यावी
तदाकार हे वृत्ति नाहीं स्वभावें। म्हणोनी सदा तेंचि शोधीत जावें २३

सदा सर्वदा राम सन्नीध आहे। मना सज्जना सत्य शोधूनि पाहें
अखंडीत भेटी रघूराजयोगू। मना सांडि रे मीपणाचा वियोगू २४

सदा सर्वदा योग तुझा घडावा तुझे कारणीं देह माझा पडावा
उपेक्षूं नको गुणवंता अनंता। रघूनायका मागणें हेंचि आतां २५

## स्थितप्रज्ञलक्षणें

[ श्रीमद्भगवद्गीता—अध्याय आणि श्लोक]

प्रजहाति यदा कामान् सर्वान्पार्थ मनोगतान्
आत्मन्येवात्मना तुष्टः स्थितप्रज्ञस्तदोच्यते २ – ५५

दुःखेष्वनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः
वीतरागभयक्रोधः स्थितधीर्मुनिरुच्यते २ – ५६

यः सर्वत्रानभिस्नेहस् तत्तत्प्राप्य शुभाशुभम्
नाभिनंदति न द्वेष्टि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता २ – ५७

यदा संहरते चायं कूर्मोऽङ्गानीव सर्वशः
इंद्रियाणींद्रियार्थेभ्यस् तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता    २ – ५८

विषया विनिवर्तंते निराहारस्य देहिनः
रसवर्जं रसोऽप्यस्य परं दृष्ट्वा निवर्तते    २ – ५९

यततो ह्यपि कौंतेय पुरुषस्य विपश्चितः
इंद्रियाणि प्रमाथीनि हरंति प्रसभं मनः    २ – ६०

तानि सर्वाणि संयम्य युक्त आसीत मत्परः
वशे हि यस्येंद्रियाणि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता    २ – ६१

ध्यायतो विषयान्पुंसः संगस्तेषूपजायते
संगात्संजायते कामः कामात्क्रोधोऽभिजायते    २ – ६२

क्रोधाद्भवति संमोहः संमोहात्स्मृतिविभ्रमः
स्मृतिभ्रंशाद्बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति    २ – ६३

रागद्वेषवियुक्तैस्तु विषयानिंद्रियैश्चरन्
आत्मवश्यैर्विधेयात्मा प्रसादमधिगच्छति    २ – ६४

**[ गीताई–अध्याय आणि श्लोक ]**

कामना अंतरांतील सर्व सोडूनि जो स्वयें
आत्म्यांतचि असे तुष्ट तो स्थितप्रज्ञ बोलिला    २ – ५५

नसे दुःखांत उद्वेग सुखाची लालसा नसे
नसे तृष्णा भय क्रोध तो स्थितप्रज्ञ संयमी    २ – ५६

सर्वत्र जो अनासक्त बरें वाईट लाभतां
न उल्लासे न संतापे त्याची प्रज्ञा स्थिरावली    २ – ५७

घेई ओढूनि संपूर्ण विषयांतूनि इंद्रियें
जसा कासव तो अंगें तेव्हां प्रज्ञा स्थिरावली २ – ५८

निराहार बळें बाह्य सोडी विषय साधक
आंतील न सुटे गोडी ती जळे आत्मदर्शनीं २ – ५९

करीत असतां यत्न ज्ञात्याच्याहि मनास हीं
नेती खेंचुनि वेगानें इंद्रियें दांडगींचि कीं २ – ६०

त्यांस रोधूनि युक्तीनें रहावें मत्परायण
इंद्रियें जिंकिलीं ज्यानें त्याची प्रज्ञा स्थिरावली २ – ६१

विषयांचें करी ध्यान त्यास तो संग लागला
संगांतुनि फुटे काम क्रोध कामांत ठेविला २ – ६२

क्रोधांतूनि जडे मोह मोहानें स्मृति लोपली
स्मृतिलोपें बुद्धिनाश म्हणजे आत्मनाशचि २ – ६३

राग द्वेष परी जातां आलीं हातांत इंद्रियें
स्वामित्वें विषयीं वर्ते त्यास लाभे प्रसन्नता २ – ६४

## दैवी आणि आसुरी संपत्ति

**[ गीता–अध्याय आणि श्लोक ]**

अभयं सत्त्वसंशुद्धिर् ज्ञानयोगव्यवस्थितिः
दानं दमश्च यज्ञश्च स्वाध्यायस्तप आर्जवम् १६ – १

अहिंसा सत्यमक्रोधस् त्यागः शांतिरपैशुनम्
दया भूतेष्वलोलुत्वं मार्दवं ह्रीरचापलम १६ – २

★

तेजः क्षमा धृतिः शौचम् अद्रोहो नातिमानिता
भवंति संपदं दैवीम् अभिजातस्य भारत १६ – ३

दंभो दर्पोऽभिमानश्च क्रोधः पारुष्यमेव च
अज्ञानं चाभिजातस्य पार्थ संपदमासुरीम् १६ – ४

आशापाशशतैर्बद्धाः कामक्रोधपरायणाः
ईहंते कामभोगार्थम् अन्यायेनार्थसंचयान् १६ – १२

इदमद्य मया लब्धम् इमं प्राप्स्ये मनोरथम्
इदमस्तीदमपि मे भविष्यति पुनर्धनम् १६ – १३

असौ मया हतः शत्रुर् हनिष्ये चापरानपि
ईश्वरोऽहमहं भोगी सिद्धोऽहं बलवान्सुखी १६ – १४

आढ्योऽभिजनवानस्मि कोऽन्योऽस्ति सदृशो मया
यक्ष्ये दास्यामि मोदिष्य इत्यज्ञानविमोहिताः १६ – १५

अहंकारं बलं दर्पं कामं क्रोधं च संश्रिताः
मामात्मपरदेहेषु प्रद्विषंतोऽभ्यसूयकाः १६ – १८

त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः
कामः क्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत त्रयं त्यजेत् १६ – २१

एतैर्विमुक्तः कौंतेय तमोद्वारैस्त्रिभिर्नरः
आचरत्यात्मनः श्रेयस्ततो याति परां गतिम् १६ – २२

**[ गीताई-अध्याय आणि श्लोक ]**

निर्भयत्व मनःशुद्धि योगज्ञानीं सुनिश्चय
यज्ञ निग्रह दातृत्व स्वाध्याय ऋजुता तप १६ – १

अहिंसा शांति अक्रोध त्याग सौजन्य सत्यता
अलुब्धता दया भूतीं मर्यादा स्थैर्य मार्दव १६ - २

पवित्रता क्षमा तेज धैर्य अद्रोह नम्रता
हे त्याचे गुण जो आला दैवी संपत्ति घेउनी १६ - ३

दंभ मीपण अज्ञान क्रोध दर्प कठोरता
लाभती गुण हे त्यास ज्याची संपत्ति आसुरी १६ - ४

आशेचे लेइले फांस कामक्रोधांत तत्पर
भोगासाठीं अधर्मानें इच्छिती धनसंचय १६ - १२

हें आज लाभलें आतां तो जोडीन मनोरथ
हें आहे तेंहि होईल माझेंचि सगळें धन १६ - १३

मीं मारिलाचि तो शत्रु मारीन दुसरेहि जे
मी स्वामी आणि मी भोक्ता सुखी मी सिद्ध मी बळी १६ - १४

कुलीन मीचि संपन्न माझी जोडी कुठे असे
यज्ञ-दान-विलासी मी जल्पती अज्ञ मोहित १६ - १५

अहंकारें बळें दर्पें कामक्रोधें भरूनियां
माझा स्व-पर देहांत करिती द्वेष मत्सरी १६ - १८

काम क्रोध तसा लोभ आत्मनाशास कारण
तीन हीं नरकद्वारें टाळावींचि म्हणूनिया १६ - २१

तमाचीं हीं तिन्ही द्वारें टाळूनि सुटला मग
कल्याणमार्ग सेवूनि पावे उत्तम तो गति १६ - २२

# सदाचार

## [ गीता-अध्याय आणि श्लोक ]

देवद्विजगुरुप्राज्ञपूजनं शौचमार्जवम्
ब्रह्मचर्यमहिंसा च शारीरं तप उच्यते १७ - १४

अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहितं च यत्
स्वाध्यायाभ्यसनं चैव वाङ्मयं तप उच्यते १७ - १५

मनःप्रसादः सौम्यत्वं मौनमात्मविनिग्रहः
भावसंशुद्धिरित्येतत् तपो मानसमुच्यते १७ - १६

श्रद्धया परया तप्तं तपस्तत्त्रिविधं नरैः
अफलाकांक्षिभिर्युक्तैः सात्त्विकं परिचक्षते १७ - १७

सत्कारमानपूजार्थं तपो दंभेन चैव यत्
क्रियते तदिह प्रोक्तं राजसं चलमध्रुवम् १७ - १८

मूढग्राहेणात्मनो यत् पीडया क्रियते तपः
परस्योत् सादनार्थं वा तत्तामसमुदाहृतम् १७ - १९

दातव्यमिति यद्दानं दीयतेऽनुपकारिणे
देशे काले च पात्रे तद्दानं सात्त्विकं स्मृतम् १७ - २०

यत्तु प्रत्युपकारार्थं फलमुद्दिश्य वा पुनः
दीयते च परिक्लिष्टं तद्दानं राजसं स्मृतम् १७ - २१

अदेशकाले यद्दानम् अपात्रेभ्यश्च दीयते
असत्कृतमवज्ञातं तत्तामसमुदाहृतम् १७ - २२

सद्भावे साधुभावे च सदित्येतत्प्रयुज्यते
प्रशस्ते कर्मणि तथा सच्छब्दः पार्थ युज्यते १७ – २६
अश्रद्धया हुतं दत्तं तपस्तप्तं कृतं च यत्
असदित्युच्यते पार्थ न च तत्प्रेत्य नो इह १७ – २८

## [ गीताई–अध्याय आणि श्लोक ]

गुरुदेवादिकीं पूजा स्वच्छता वीर्यसंग्रह
अहिंसा ऋजुता अंगीं देहाचें तप बोलिलें १७ – १४
हितार्थ बोलणें सत्य प्रेमानें न खुपेलसें
स्वाध्याय करणें नित्य वाणीचें तप बोलिलें १७ – १५
प्रसन्नवृत्ति सौम्यत्व आत्मचिंतन संयम
भावना राखणें शुद्ध मनाचें तप बोलिलें १७ – १६
तिहेरी तप तें सारें श्रद्धा उत्कट जोडुनि
समत्वें फल सोडूनि घडलें जाण सात्त्विक १७ – १७
सत्कारादिक इच्छूनि केलें जें दंभ राखुनी
तें चंचळ इथें जाण तप राजस अस्थिर १७ – १८
दुराग्रहेंचि जें होय अंतरात्म्यास पीडुनी
किंवा तें परघातार्थ जाण तामस तें तप १७ – १९
देशीं काळीं तसें पात्रीं उपकार न इच्छितां
धर्मभावेंचि तें देणें जाण तें दान सात्त्विक १७ – २०
उपकार अपेक्षूनि अथवा फळ वांछुनी
क्लेशपूर्वक जें देणें जाण तें दान राजस १७ – २१

करूनि भावना तुच्छ देशादिक न पाहतां
अनादरेंचि जें देणें जाण तें दान तामस १७ – २२

सत्कार-स्मरणें लाभे सत्यता आणि साधुता
तशी सुंदरता कर्मीं सत्कारें बोलिली असे १७ – २६

यज्ञ दानें तपें कर्में अश्रद्धेनें अनुष्ठिलीं
बोलिलीं सर्व तीं मिथ्या दोन्ही लोकांत निष्फळ १७ – २८

## गीतासार

**[ गीता–अध्याय आणि श्लोक ]**

१ ) सर्वभूतेषु येनैकं भावमव्ययमीक्षते
अविभक्तं विभक्तेषु तज्ज्ञानं विद्धि सात्त्विकम् १८ – २०

२ ) पृथक्त्वेन तु यज्ज्ञानं नानाभावान् पृथग्विधान्
वेत्ति सर्वेषु भूतेषु तज्ज्ञानं विद्धि राजसम् १८ – २१

३ ) यत्तु कृत्स्नवदेकस्मिन् कार्ये सक्तमहैतुकम्
अतत्त्वार्थवदल्पं च तत्तामसमुदाहृतम् १८ – २२

४ ) मुक्तसंगोऽनहंवादी धृत्युत्साहसमन्वितः
सिद्ध्यसिद्ध्योर्निर्विकारः कर्ता सात्त्विक उच्यते १८ – २६

५ ) रागी कर्मफलप्रेप्सुर्लुब्धो हिंसात्मकोऽशुचिः
हर्षशोकान्वितः कर्ता राजसः परिकीर्तितः १८ – २७

६ ) अयुक्तः प्राकृतः स्तब्धः शठो नैष्कृतिकोऽलसः
विषादी दीर्घसूत्री च कर्ता तामस उच्यते १८ – २८

७) यत्तदग्रे विषमिव परिणामेऽमृतोपमम्
तत्सुखं सात्त्विकं प्रोक्तम् आत्मबुद्धिप्रसादजम् १८ – ३७

८) विषयेंद्रियसंयोगात् यत्तदग्रेऽमृतोपमम्
परिणामे विषमिव तत्सुखं राजसं स्मृतम् १८ – ३८

९) यदग्रे चानुबंधे च सुखं मोहनमात्मनः
निद्रालस्यप्रमादोत्थं तत्तामसमुदाहृतम् १८ – ३९

१०) यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम्
स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विंदति मानवः १८ – ४६

११) सर्वकर्माण्यपि सदा कुर्वाणो मद्व्यपाश्रयः
मत्प्रसादादवाप्नोति शाश्वतं पदमव्ययम् १८ – ५६

**[ गीताई-अध्याय आणि श्लोक ]**

भूतमात्रांत जें पाहे भाव एक सनातन
अभिन्न भेदलेल्यांत जाण तें ज्ञान सात्त्विक १८ – २०

भेदबुद्धीस पोषूनि सर्व भूतांत पाहतें
वेगळे वेगळे भाव जाण तें ज्ञान राजस १८ – २१

एका देहांत सर्वस्व मानुनी गुंतले वृथा
भावार्थहीन जें क्षुद्र जाण तें ज्ञान तामस १८ – २२

निःसंग निरहंकार उत्साही धैर्यमंडित
फळो जळो चळेना तो कर्ता सात्त्विक बोलिला १८ – २६

फलकामुक आसक्त लोभी अस्वच्छ हिंसक
मारिला हर्षशोकें तो कर्ता राजस बोलिला १८ – २७

स्वच्छंदी क्षुद्र गर्विष्ठ घातकी शठ आळशी
दीर्घसूत्री सदाखिन्न कर्ता तामस बोलिला  १८ – २८

जें कडू विख आरंभीं अंतीं अमृततुल्यचि
आत्म्यांत शुद्ध बुद्धीस लागलें सुख सात्त्विक  १८ – ३७

आरंभीं गोडसें वाटे अंतीं मारक जें विख
भासे विषयसंयोगें इंद्रिया सुख राजस  १८ – ३८

निद्रा आळस दुर्लक्ष ह्यांनीं आत्म्यास घेरुनी
आरंभीं परिणामींहि गुंगवी सुख तामस  १८ – ३९

जो प्रेरी भूतमात्रास ज्याचा विस्तार विश्व हें
स्वकर्मकुसुमीं त्यास पूजितां मोक्ष लाभतो  १८ – ४६

करुनीहि सदा कर्मे सगळीं मज सेवुनी
पावे माझ्या कृपेनें तो अवीट पद शाश्वत  १८ – ५६

## प्रेमळ पदें

### (१)

असा धरि छंद । जाइ तुटोनिया भवबंध  । ध्रु०

छंद लागला टिटवीला । तिनें समुद्रही शोषिला
मैनावतीनें कृतार्थ केला । गोपीचंद ॥ जाइ तुटोनि०॥ १

दुधाचा सागर उपमन्युला । अढळपदीं ध्रुव स्थापिला
मार्कंडेयें यम हटवीला । चालला मंद ॥ जाइ०॥  २

93405

तीन देह जडभरताला। रावणरूप तो झाला
गोपी चढल्या वैकुंठाला। यशोदानंद ॥जाइ०॥ ३

आळीस भ्रमराचा अध्यास। होतां भ्रमरपणा ये तीस
तैसा सांडुनि जीवपणास। भोगी आनंद ॥जाइ०॥ ४

छंदें असाध्यही साधिती। नर ते नारायणही होती
दीनबंधुहरि आपुला करिती। निजसुखकंद ॥जाइ०॥ ५

(२)

असा कसा देवाचा देव बाई ठकडा
देव एका पायानें लंगडा। ग बाई ॥असा कसा०॥

गवळ्याघरीं जातो। दहीं-दुध खातो
करि दह्यादुधाचा रबडा। ग बाई ॥असा कसा०॥ १

शिंकेंचि तोडीतो। मडकेंचि फोडीतो
पाडी नवनीताचा सडा। ग बाई ॥असा कसा०॥ २

वाळवंटीं जातो। कीर्तन करितो
घेतो साधुसंतांसी झगडा। ग बाई ॥असा कसा०॥ ३

एकाजनार्दनी। भिक्षा वाढा बाई
देव एकनाथाचा बचडा। ग बाई ॥असा कसा०॥ ४

(३)

हरिभजनावीण काळ घालवूं नको रे ।धृ०।

दोरीच्या सापा भिउनी भवा। भेटी नाहीं जिवा शिवा
अंतरिंचा ज्ञानदिवा। मालवूं नको रे १

विवेकाची ठरेल ओल । ऐसे बोलावे कीं बोल
आपुल्या मतें उगीच चिखल । कालवूं नको रे २
संतसंगतीनें उमज । आणुनी मनीं पुरती समज
अनुभवावीण मान । डोलवूं नको रे ३
सोहिरा म्हणे ज्ञानज्योती । तेथें कैंची दिवसराती
तयाविणें नेत्रपाती । हालवूं नको रे ४

( ४ )

श्रीरंगा दे मजला सत्संगा । आलों शरण तुला १
रघुनाथा आवडो तव गुणगाथा ॥ आलों० २
गोविंदा सोडवीं विषयछंदा ॥ आलों० ३
स्वानंदा विसरवीं विषयछंदा ॥ आलों० ४
श्रीकृष्णा दूर करीं धनतृष्णा ॥ आलों० ५
रघुराया आवरी आपुली माया ॥ आलों० ६
गोपाळा उघडीं चिन्मय डोळा ॥ आलों० ७
श्रीरामा दे मज भजनप्रेमा ॥ आलों० ८
घनश्यामा नेई मज निजधामा ॥ आलों० ९
भगवंता तारी विठ्ठलपंता ॥ आलों० १०

( ५ )

माझं अचडं बचडं छकडं ग ॥माझं०॥ ।धृ०।
विकसित पंकज लोचन ज्याचे
जननी म्हणे हें चिपडं ग ॥माझं०॥ १

त्रिभुवन पालक बालक त्याला
पांघरविते घोंगडं ग ॥माझं०॥ २

अंगणीं रांगत मंजुळ बोलत
माझं सोन्याचं ठिगडं ग ॥माझंच ३

माध्वमुनीश्वर खेळवि अंकीं
ब्रह्म सनातन उघडं ग ॥माझं०॥ ४

( ६ )

तूं खाय गा साखरलोणी । माझ्या बाळा गा । धृ० ।
चकोर भंवरा विटीदांडू
रंगीत गोट्या बेगडा चेंडू । खेळुनी खेळा गा १

नऊ लक्ष गाई गडी
वाट पाहती यमुनेथडी । गोपाळा २

बालमुकंद खातो लोणी
कौतुक पाहे नंदराणी । भरुनी डोळा गा ३

भानुदास विनंती करी
प्रसाद द्यावा बा श्रीहरी । त्रिभुवन पाळा गा ४

## करुणाष्टकें

( १ )

अनुदिनिं अनुतापें तापलों रामराया
परम दिनदयाळा नीरसी मोहमाया

अचपल मन माझे नावरे आवरीतां
तुजविण शिण होतो धांव रे धांव आतां १
भजनरहित रामा सर्वही जन्म गेला
स्वजनधनजनाचा व्यर्थ म्यां स्वार्थ केला
रघुपति मति माझी आपुलीशी करावी
सकळ त्यजुनि भावें कांस तुझी धरावी २
तनुमनधन माझें राघवा रूप तूझें
तुजविण मज वाटे सर्व संसार वोझें
प्रचलित न करावी सर्वथा बुद्धि माझी
अचल भजनलीला लागली आस तूझी ३
चपळपण मनाचें मोडितां मोडवेना
सकळ स्वजन माया तोडितां तोडवेना
घडि घडि विघडे हा निश्चयो अंतरींचा
म्हणउनि करुणा हे बोलतों दीनवाचा ४
जळत हृदय माझें जन्म कोट्यानुकोटी
मजवरि करुणेचा राघवा पूर लोटी
तळमळ निववी रे राम कल्याणसिंधू
पडरिपुकुल माझें तोडी याचा समंधू ५
तुजविण करुणा हे कोण जाणेल माझी
शिणत शिणत पोटीं पाहिली वाट तूझी
झडकरि झड घाली धांव पंचानना रे
तुजविण मज नेती जंबुकी वासना रे ६

स्वजनजनधनाचा कोण संतोष आहे
रघुपतिविण आतां चित्त कोठें न राहे
जिवलग जीव घेती प्रेत सांडूनि जाती
विषय सकळ नेती मागुता जन्म देती ७

सकळ जन भवाचे आथिले वैभवाचे
जिवलग मज कैंचे चालतें हेंचि साचें
विलगविषमकाळीं सांडिती सर्व माळीं
रघुविर सुखदाता सोडवी अंतकाळीं ८

उपरति मज रामीं जाहली पूर्णकामीं
सकळजनविरामीं रामविश्रामधामीं
घडि घडि मन आतां रामरूपीं भरावें
रघुकुळटिळका रे आपुलेंसें करावें

( २ )

नसे भक्ति ना ज्ञान ना ध्यान कांहीं। नसे प्रेम हें रामविश्वास नाहीं
असा दीन अज्ञान मी दास तूझा। समर्था जनीं घेतला भार माझा १

रघुनायका जनाजन्मांतरींचा। अहंभाव छेदूनि टाकी दिनाचा
जनीं बोलती दास या राघवाचा। परी अंतरीं लेश नाहीं तयाचा २

रघूनायका दीन हातीं धरावें। अहंभाव छेदूनिया उद्धरावें
अगूणी तयालागीं गूणी करावें। समर्थे भवसागरीं उतरावें ३

किती भार घालूं रघूनायकाला। मजकारणें शीण होईल त्याला
दिनानाथ हा संकटीं धांव घाली। तयाचेनि हे सर्व काया निवाली ४

मज कोंवसा राम कैवल्यदाता। तयाचेनि हे फीटली सर्व चिंता
समर्था तया काय उत्तीर्ण व्हावें । सदा सर्वदा नाम वाचें वदावें ५
दिनाचें उणें दीसतां लाज कोणा। जनीं दास तुझा दिसे दैन्यत्राणा
शिरीं स्वामि तूं राम पूर्णप्रतापी। तुझा दास पाहे सदा शीघ्रकोपी ६

( ३ )

उदासीन हे वृत्ति जीवीं धरावी। अती आदरें सर्व सेवा करावी
सदा प्रीति लागो तुझे गूण गातां। रघूनायका मागणें हेंचि आतां १
तुझें रूपडें लोचनीं म्यां पहावें। तुझे गुण गातां मनेंसी रमावें
उठो आवडी भक्तिंपथेंचि जातां। रघूनायका० २
मनीं वासना भक्ति तूझी करावी। कृपाळूपणें राघवें पूरवावी
वसावें मज अंतरीं नाम घेतां। रघूनायका० ३
सदा सर्वदा योग तुझा घडावा। तुझे कारणीं देह माझा पडावा
उपेक्षूं नको गुणवंता अनंता। रघूनायका० ४
नको द्रव्यदारा नको येरझारा। नको मानसीं ज्ञानगर्वें फुगारा
सगूणीं मला लावि रे भक्तिपंथा। रघूनायका० ५
भवें तापलों प्रीतिछाया करावी। कृपासागरें सर्व चिंता हरावी
मज संकटीं सोडवावें समर्था। रघूनायका० ६
मनीं कामना कल्पना ते नसावी। कुबुद्धी कुडी वासना नीरसावी
नको संशयो तोडि संसारवेथा। रघूनायका० ७
समर्थापुढें काय मागूं कळेना। दुराशा मनीं बैसली हे ढळेना
तुटे संशयो नीरसी सर्व चिंता। रघूनायका० ८

ब्रिदाकारणें दीन हातीं धरावें । म्हणे दास भक्तांसि रे उद्धरावें
सुटे ब्रीद आम्हांसि सांडूनि जातां । रघूनायका मागणें हेंचि आत ९

## पसायदान

[ श्रीज्ञानेश्वरी-अध्याय आणि ओवी ]

आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावें
तोषोनि मज द्यावें । पसायदान हें १८-९३

जे खळांची व्यंकटी सांडो ! तया सत्कर्मीं रती वाढो
भूतां परस्परें जडो । मैत्र जीवांचें ९४

दुरिताचें तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्यें पाहो
जो जें वांछील तो तें लाहो । प्राणिजात ९५

वर्षत सकळ मंगळीं । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी
अनवरत भूतळीं । भेटो तया भूतां ९६

चलां कल्पतरूंचे अरव । चेतना चिंतामणीचे गांव
बोलते जे अर्णव । पीयूषाचे ९७

चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन
ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ९८

किंबहुना सर्वसुखीं । पूर्ण होऊनि तिहीं लोकीं
भजिजो आदिपुरुखीं । अखंडित ९९

## केकावली

अतर्क्य महिमा तुझा, गुणहि फार, बा हे विधी
श्रुतिज्ञहि म्हणे सदा, स्तविल आमुची केवि धी

तरी जन यथामति स्तवुनि जाहले सन्मती
स्तवार्थ तुझिया तुझ्यासम कवी कधीं जन्मती १

प्रभो शरण आलियावरि न व्हां कधीं वांकडे
म्हणोनि इतुकेंचि हें स्वहितकृत्य जीवांकडे
प्रसाद करितां नसे पळ विलंब बापा खरें
घनांबु न पडे मुखीं उघडिल्याविना पांखरें २

असो वरि कसा तरी विमल भाव ज्याचा करा-
तयावरि दया, पचे वर असाचि द्या चाकरा
वृथाचि गमतें दिलें बहुहि जें न दासा जिरे
पुसोनि अधिकार द्या, सुकर तें सदा साजिरें ३

सुसंगति सदा घडो, सुजनवाक्य कानीं पडो
कलंक मतिचा झडो विषय सर्वथा नावडो
सदंघ्रिकमळीं दडो मुरडितां हटानें अडो
वियोग घडतां रडो, मन भवच्चरित्रीं जडो ४

न निश्चय कधीं ढळो कुजनविघ्नबाधा टळो
न चित्त भजनीं चळो मति सदुक्तमार्गीं वळो
स्वतत्त्व हृदया कळो दुरभिमान सारा गळो
पुन्हां न मन हें मळो दुरित आत्मबोधें जळो ५

मुखीं हरि, वसो तुझी कुशलधाम नामावली
क्षणांत पुरवील जी सकळ कामना मावली
कृपा करिशि तूं जगत्त्रयनिवास दासांवरी
तशी प्रकट हे निजाश्रितजना सदा सांवरी ६

दयामृतघना अहो हरि, वळा मयूराकडे
रडे शिशु तयासि घे कळवळोनि माता कडे
असा अतिथि धार्मिकस्तुतपदा कदा सांपडे
तुम्हां जड भवार्णवीं उतरितां न दासां पडे ७

## उपदेशपर फटका

बिकट वाट वहिवाट नसावी धोपट मार्गा सोडुं नको
संसारामधिं ऐस आपला उगाच भटकत फिरूं नको
चल सालसपण धरुनि निखालस खोट्या बोला बोलुं नको
अंगीं नम्रता सदा असावी राग कुणावर धरूं नको
नास्तिकपणांत शिरुनि जनाचा बोल आपणां घेउं नको
भली भलाई कर कांहीं पण अधर्ममार्गीं शिरूं नको
मायबापावर रुसूं नको । दूर एकला बसूं नको
व्यवहारामधिं फसूं नको । कधीं रिकामा असूं नको
परी उलाढाली भलभलत्या पोटासाठीं करूं नको १

वर्म काढुनि शरमायला उणें कुणाला बोलुं नको
बुडवाया दुसऱ्याचा ठेवा करुनी हेवा झटूं नको
मी मोठा शहाणा धनाढ्यहि गर्वभार हा वाहुं नको
एकाहुन एक चढ जगामधिं थोरपणाला मिरवुं नको
हिमायतीच्या बळें गरिबगुरिबाला तूं गुरकावुं नको
दों दिवसांची जाइल सत्ता अपेश माथां घेउं नको

बहुत कर्जबाजारी होउनि बोज आपला दवडुं नको
स्नेह्यासाठीं पदरमोड कर परंतु जामिन राहुं नको
विडा पैजेचा उचलुं नको । उणी तराजूं तोलुं नको
गहाण कुणाचें बुडवुं नको । असल्यावर भिक मागुं नको
नसल्यावर सांगणें कशाला गाव तुझा भिड धरुं नको २
उगीच निंदा स्तुती कुणाची स्वहितासाठीं करूं नको
बरी खुशामत शहाण्याची परि मूर्खाची ती मैत्री नको
कष्टाची बरी भाजीभाकरी तूपसाखरे चोरुं नको
आल्या अतिथा मुठभर द्याया मागेंपुढतीं पाहुं नको
दिली स्थिती देवानें तींतच मानी सुख कधिं विटूं नको
असल्या गांठीं धनसंचय कर सत्कार्यीं व्यय हटूं नको
आतां तुज ही गोष्ट सांगतों सत्कर्मा ओसरूं नको
सत्कीर्तिनौबदीचा डंका गाजे मग शंकाच नको
सुविचारा कातरूं नको । सत्संगति अंतरूं नको
द्वैताला अनुसरूं नको । हरिभजना विस्मरूं नको
गावयास अनंतफंदीचा हा फटका मागें सरूं नको ३

## उत्तमलक्षण

**[ दासबोध : दशक २, समास २ ]**

विचारेंविण बोलों नये । विवंचनेविण चालों नये
मर्यादेविण हालों नये । कांहीं एक

जनीं आर्जव तोडूं नये । पापद्रव्य जोडूं नये
पुण्यमार्ग सोडूं नये । कदाकाळीं
वक्तयास खोदूं नये । ऐक्यतेसी फोडूं नये
विद्याभ्यास सोडूं नये । कांहीं केल्या
अति क्रोध करूं नये । जिवलगांस खेदूं नये
मनीं वीट मानूं नये । सिकवणेचा
बोलिला बोल विसरूं नये । प्रसंगीं सामर्थ्य चुकों नये
केल्याविण निखंदूं नये । पुढिलांसी कदा
आळसें सुख मानूं नये । चहाडी मनास आणूं नये
शोधिल्याविण करूं नये । अर्थ कांहीं
सुखा अंग देऊं नये । प्रयत्न पुरुषें सोडूं नये
कष्ट करितां त्रासों नये । निरंतर
सभेमध्यें लाजों नये । बाष्कळपणें बोलों नये
पैज होड घालों नये । कांहीं केल्या
कोणाचा उपकार घेऊं नये । घेतला तरी राखों नये
परपीडा करूं नये । विश्वासघात
व्यापकपण सांडूं नये । पराधीन होऊं नये
आपलें ओझें घालूं नये । कोणीएकासी
लटकी आळ घेऊं नये । सभेस लटिकें करूं नये
आदर नसतां बोलों नये । स्वाभाविक
कामेंविण राहों नये । नीच उत्तर साहों नये
आसुदें अन्न खाऊं नये । वडिलांचेंही

तोंडीं शिवी असों नये। दुसऱ्यास देखोन हांसों नये
उणें अंगीं संचारों नये। कुळवंताचे
देखिली वस्तू चोरूं नये। बहुत कृपण होऊं नये
जिवलगांसी करूं नये। कळह कदा
अल्पधनें माजों नये। हरिभक्तीस लाजों नये
मर्यादेवीण चालों नये। पवित्र जनीं
सत्यमार्ग सांडूं नये। असत्य पंथें जाऊं नये
कदा अभिमान घेऊं नये। असत्याचा
अपकीर्ति ते सांडावी। सत्कीर्ति वाढवावी
विवेकें दृढ धरावी। वाट सत्याची

## उपदेशपर अभंग

(१)

जे कां रंजले गांजले। त्यांसी म्हणे जो आपुले
तोचि साधू ओळखावा। देव तेथेंचि जाणावा
मृदु सबाह्य नवनीत। तैसें सज्जनाचें चित्त
ज्यासी आपंगिता नाहीं। त्यासी धरी जो हृदयीं
दया करणें पुत्रासी। तेचि दासां आणि दासीं
तुका म्हणे सांगों किती। तोचि भगवंताची मूर्ति

(२)

ऐसें असावें संसारीं। जोंवरि प्राचीनाची दोरी
पक्षी अंगणासी आले। आपुला चारा चरोनि गेले

मुलीं घरचार मांडिला । खेळ मोडोनि टाकिला
वाटसरू वाटा आले । प्रात:काळीं उठोनि गेले
मार्गी बहुसाल भेटले । तेथें मन नाहीं गुतलें
एका विनवी जनार्दना । ऐसें असतां भय कोणा

( ३ )

जोडोनियां धन उत्तम वेव्हारें । उदास विचारें वेंच करी
उत्तमचि गती तो एक पावेल । उत्तम भोगील जीव खाणी
परउपकारों नेणें परनिंदा । परस्त्रिया सदा बहिणी मायी
भूतदया गाईपशूंचें पाळण । तान्हेल्या जीवन वनामाजी
शांतिरूपें नव्हे कोणाशीं वाईट । वाढवी महत्त्व वडिलांचें
तुका म्हणे हेंचि आश्रमाचें फळ । परमपद बळ वैराग्याचें

( ४ )

बहुतां छंदांचे बहु वसे जन । नये वांटू मन त्यांच्या संगें
करावा जतन आपुला विश्वास । अंगा आला रस आवडीचा
सुखाची समाधी हरिकथा माउली । विश्रांति साउली शिणलियांची
तुका म्हणे बुडे बांधोनि दगड । तेथें काय कोड धांवायाचें

( ५ )

पराविया नारी माउलीसमान । मानिलीया धन काय वेंचे ?
न करितां परनिंदा परद्रव्यअभिलाष । काय तुमचें यास वेंचे सांगा ?
बैसलिये ठायीं म्हणतां राम राम । काय होय श्रम ऐसें सांगा ?
संतांच्या वचनीं मानितां विश्वास । काय तुमचें यास वेंचे सांगा ?
खरें बोलतां कोण लागतो सायास । काय वेंचे यास ऐसें सांगा ?
तुका म्हणे देव जोडे याजसाठीं । आणिक ते आटी नलगे कांहीं

( ६ )

दुर्बुद्धि ते मना कदा । नुपजो नारायणा
आतां मज ऐसें करी । तुझे पाय चित्तीं धरीं
उपजला भावो । तुझे कृपे सिद्धी जावो
तुका म्हणे आतां । लाभ नाहीं यापरता

( ७ )

देवा ! आतां ऐसा करीं उपकार । देहाचा विसर पाडीं मज
तरीच हा जीव सुख पावे माझा । बरें केशवराजा कळों आलें
ठाव देईं चित्ता राखें पायांपाशीं । सकळ वृत्तींशीं अखंडित
आस, भय, चिंता, लाज, काम, क्रोध । तोडावा संबंध यांचा माझा
मागणें तें एक हेंचि आहे आतां । नाम मुखीं संतसंग देईं
तुका म्हणे नको वरपंग देवा । घेईं माझी सेवा भावशुद्ध

## हिंदी पदें

(१)

कान्हा तोरे घुंगरियां पहेरी रे । होरी खेले किसन गिरिधारी । धृ०।
अलिकोरे गंगा । वोलीकोरे जमुना। बिचमो गोकुलनगरी १
जमुनाके नीरतीर। धेनु चरावे । खेलत है राधा प्यारी २
मोरमुकुट पीतांबर शोभे । कुंडलकी छबि न्यारी ३
मीराके प्रभु गिरिधरनागर । चरणकमल बलिहारी ४

(२)

नजर न आवे आतमज्योती ॥धृ०॥
तेल न बत्ती बुज नहीं जाती । नहीं जागत नहीं सोती १
झिलमिल झिलमिल निशिदिनीं चमके । जैसा निर्मल मोती २
कहत कबीरा सुनो भाई साधो । घरघर वांचत पोथी ३

(३)

पग घुंगुरू बांधकर नाची रे ॥धृ०॥
मैं तो अपने नारायणकी । हो गई आपही दासी रे १
विषका प्याला राणाजीने भेजा । बिपत मीरा हांसी रे २
लोक कहे मीरा भईरे बावरी । बाप कहे कुल नासी रे ३
मीराके प्रभु गिरिधरनागर । हरिचरणकी दासी रे ४

(४)

चलो मन गंगा जमुना के तीर ॥धृ०॥
गंगा जमुना निरमल पानी । शीतल होत शरीर १

बन्सी बजावत गावत कान्हा । संग लिये बलधीर २
मोरमुकुट पीतांबर शोभे । कुंडल झलकत हीर ३
मीरा कहे प्रभु गिरिधरनागर । चरणकमलपर शीर ४

(५)

झूलत राधा संग गिरिधर । झूलत राधा संग ॥धृ०॥
अबीर गुलालकी धूम मचाई । भर पिचकारी रंग १
लाल भई ब्रिंदावन जमुना । केशर चूंबत रंग २
नाचत ताल अधर सुरवर । धिमी बाजे मृदंग ३
मीराके प्रभु गिरिधरनागर । चरणकमलकू दंग ४

(६)

मन माने जब तार प्रभुजी ॥धृ०॥
नदीयां गहरी नाव पुरानी । कैसी उतारूं पार १
पोथी पुरान सबकुछ देखे । अंत न लागे पार २
मीरा कहे प्रभु गिरिधरनागर । नाम निरंतर सार ३

(७)

मोहे लागी लटक हरि चरननकी ॥धृ०॥
चरनबिना मुझे कछु नहिं भावे । झूट माया सब सपननकी १
भवसागर सब सूख गया है । फिकर नहीं मुझे तरननकी २
मीरा कहे प्रभु गिरिधरनागर । उलट भई मोरे नयननकी ३

(८)

वृक्षनकी मतीहि ले रे मना ॥धृ०॥

दृढ आसन मनसा नहीं डोले। सुमिरनसे चित्त दे रे मना १

शीत उष्ण सहे शिर उप्पर। पक्षिनको सुख दे रे मना २

कांटन हारसे वैरभाव नहीं। सींचन हारसे नहीं स्नेह रे मना ३

जो कोई फत्तर फेंकके मारे। उपरसे फल दे रे मना ४

तन मन धन सब परमार्थमें। लाग्यो रहे नित्य स्नेह रे मना ५

कहत कबीरा ऐसे संतको। साहेब दर्शन दे रे मना ६

## इंग्रजी पदें

### ( 1 )

Take my life, and let it be
Consecrated, Lord ! to Thee;
Take my hands, and let them move
At the impulse of Thy love.

Take my moments and my days,
Let them flow in ceaseless praise.
Take my feet, and let them be
Swift and beautiful for Thee.

Take my voice, and let me sing
Always, only for my King;
Take my lips, and let them be
Filled with messages from Thee.

Take my silver and my gold;
Not a mite would I withhold.
Take my intellect, and use
Every power as Thou shalt choose.

Take my will, and make it Thine;
It shall be no longer mine.
Take my heart; it is Thine own;
It shall be Thy Royal Throne.

Take my love; my lord, I pour
At Thy feet it's treasure-store.
Take myself, and I will be
Ever, only, all for Thee.

(2)

Lead kindly Light, amid the encircling gloom
Lead Thou me on.
The night is dark and I am far from home,
Lead Thou me on.
Keep Thou my feet, I do not ask to see
The distant scene; one step enough for me.
I was not ever thus, not prayed that Thou
Shouldst lead me on;
I loved to choose and see my path; but now
Lead Thou me on.
I loved the garish day, and spite of fears,
Pride ruled my will; remember not past years.
So long Thy power hath blest me, sure it still
Will lead me on,
O'er moor and fen, o'er crag and torrent, till
The night is gone;
And with the morn, those angel faces smile,
Which I have loved long since and lost awhile.

(3)

When the mists have rolled in splendour
From the beauty of the hills,
And the sunlight falls in gladness
On the river and the rills,

We recall our Father's promise
In the rainbow of the spray;
We shall know each other better
When the mists have rolled away.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 73416
संग्रह शाखा

CHORUS :

We shall know as we are known;
Never more to walk alone,
In the dawning of the morning
of that bright and happy day;
We shall know each other better
When the mists have rolled away.

Oft we tread the path before us
With a weary burdened heart;
Oft we toil amid the shadows
And our fields are far apart :
But the Saviour's "Come, ye blessed",
All our labour will repay,
When we gather in the morning
Where the mists have rolled away.

We shall come with joy and gladness,
We shall gather round the Throne;
Face to face with those that love us,
We shall know as we are known.
And the song of our redemption
Shall resound through endless day,
When the shadows have departed
And mists have rolled away.

REFBK-0013507
REFBK-0013507

# विद्यार्थ्यांस सूचना

(१) दररोज रात्रीं झोपण्यापूर्वी आई-वडिलांस नमस्कार करावा.

(२) पहाटेस उठून अथवा रात्रीं जागून अभ्यास करण्याची संवय ठेवावी. दररोज कमींत कमी तीन तास तरी अभ्यास घरीं करावा.

(३) आई-वडिलांना त्यांच्या कामांत मदत करावी.

(४) वर्तमानपत्र दररोज वाचावें आणि त्यांतील अग्रलेख काळजीपूर्वक वाचावा.

(५) घरांत, नातेवाइकांत किंवा मित्रमंडळींत कोणी आजारी पडल्यास समाचारास जावें आणि त्यांना शक्य तेवढी मदत करावी.

(६) नेहमीं सर्वांच्या उपयोगीं पडावें.

(७) नियमितपणानें व्यायाम करावा.

(८) गुरुजनांबद्दल नितांत आदर बाळगावा.

(९) प्रत्येक परीक्षेंत आपला क्रमांक वर आणण्याची महत्त्वाकांक्षा ठेवावी.

(१०) सदा हंसतमुख असावें.

(११) सर्वांशीं प्रेमानें बोलावें, प्रेमानें वागावें.

(१२) चांगलीं पुस्तकें खूप वाचावींत आणि त्यांवर विचार करावा.

We recall our Father's promise
In the rainbow of the spray;
We shall know each other better
When the mists have rolled away.

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. 73406
ठाणे

CHORUS :

We shall know as we are known;
Never more to walk alone,
In the dawning of the morning
of that bright and happy day;
We shall know each other better
When the mists have rolled away.

Oft we tread the path before us
With a weary burdened heart;
Oft we toil amid the shadows
And our fields are far apart :
But the Saviour's " Come, ye blessed ",
All our labour will repay,
When we gather in the morning
Where the mists have rolled away.
We shall come with joy and gladness,
We shall gather round the Throne;
Face to face with those that love us,
We shall know as we are known.
And the song of our redemption
Shall resound through endless day,
When the shadows have departed
And mists have rolled away.

REFBK-0013507
REFBK-0013507

# मुंबई स्वाध्याय मंडळ

मुलांच्या संस्कारक्षम वयांत त्यांच्या मनांवर सुसंस्कार करण्याच्या उद्देशानें दर रविवारीं एक तास मुंबई आणि बृहन्मुंबईत सांस्कृतिक शिक्षण वर्ग चालविण्याची योजना आंखण्यांत आली आहे.

या वर्गांत मुलांकडून पाठांतर आणि विशेष-वाचन करून घेण्यांत येईल. पाठांतरांत विशेषतः सांस्कृतिक पद्य-वाङ्मयाचा समावेश केला जाईल. विशेष वाचनांत प्राचीन, अर्वाचीन संत, समाजसुधारक, शास्त्रज्ञ व ऐतिहासिक थोर स्त्री-पुरुषांचीं चरित्रें आणि सद्विचारप्रवर्तक ललित वाङ्मयाचा अंतर्भाव करण्यांत येईल.

हे वर्ग विनावेतन चालविण्यासाठीं सहकार्य करण्याची इच्छा असलेल्या सेवानिवृत्त अथवा वयस्कर मंडळींनीं **प्रा. मा. गं. महाजन**, रूपारेल कॉलेज, मुंबई नं. १६ या पत्त्यावर पत्रव्यवहार करावा अगर समक्ष भेटावें. यासंबंधीं कांहीं सूचना करावयाच्या असल्यास त्या या पत्त्यावरच कळवाव्यात.